महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:एमआयएस-०१२०/सी.आर.२५/२०२१/मा.तं. दिनांक:- २२ डिसेंबर, २०२१

# -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:-** परीक्षेच्या वेळी शारीरिक/परस्पर अंतराच्या (Social Distancing) अनुषंगाने करावयाची कार्यवाही/उपाययोजना

**संदर्भ:-** आयोगाचे क्रमांक एमआयएस-०६१५/सीआर-१८/२०२०/तीन, दिनांक १९ मार्च, २०२१ रोजीचे प्रसिध्दीपत्रक

कोव्हिड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र लोकसेवा आयोगार्फत आयोजित परीक्षांकरीता आयोगाकडून विहित करण्यात आलेल्या मानक कार्यप्रणालीनुसार शारीरिक/परस्पर अंतराच्या अनुषंगाने उमेदवारांच्या आरोग्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने करावयाच्या कार्यवाहीबाबत संदर्भिय दिनांक १९ मार्च, २०२१ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकाद्वारे सूचित करण्यात आलेले आहे.

**२.** आयोगामार्फत विहित करण्यात आलेल्या मानक कार्यप्रणालीनुसार परीक्षेच्या वेळी करावयाच्या उपाययोजनांच्या कार्यपध्दतीमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे :-

२.१ आयोगामार्फत यापुढे आयोजित सर्व परीक्षांकरीता परीक्षा उपकेंद्रामध्ये प्रवेश करतांना तसेच संपूर्ण परीक्षा कालावधीमध्ये उमेदवारांनी स्वत:चा किमान तीन पदरी मुखपट (Mask) परिधान करणे अनिवार्य आहे.

२.२ आयोगामार्फत यापुढे आयोजित सर्व परीक्षांकरीता परीक्षा उपकेंद्रामध्ये प्रवेश करतांना तसेच संपूर्ण परीक्षा कालावधीमध्ये स्वच्छता (Cleanliness) व आरोग्यास हितावह (Hygienic) वातावरण राखण्यासाठी उमेदवारांनी स्वत:चे सॅनिटायझर वापरणे आवश्यक राहील.

**३.** संदर्भिय दिनांक १९ मार्च, २०२१ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकातील इतर सूचनांमध्ये कोणताही बदल नाही.

**४.** परीक्षेच्या वेळी शारीरिक/परस्पर अंतराच्या (Social Distancing) अनुषंगाने आयोगाकडून तसेच सक्षम प्राधिकरणाकडून देण्यात आलेल्या सूचना आणि प्रवेश प्रमाणपत्रावर दिलेल्या सूचनांचे उमेदवारांनी काटेकोरपणे पालन करावे.

ठिकाण: मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग